Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue X , Vol. IV (Indexed) Oct. 2018 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# Index


1. Digital Banking :An Overview — 5
   Dr Madhukar P Aghav
2. Financial Markets : Evaluating Averages and Indicators — 13
   Dr Sachin Nagnath Hadoltikar
   Memon Sohel Mohd Yusuf
3. Human Resource Management (Hrm) :An Overview — 19
   Dr. Kathar Ganesh. N.
4. Impact of Mergers & Acquisition on Private Sector Banks In Global Economy — 26
   Dr. Nanaji Krishna Aher
5. Dramatic Stress: The Spirit of Play — 32
   Sheema Farheen
   Dr Farhat Durrani
6. Recent Trend InBanking — 41
   Swapnil .Kalyan. Laghane, Dr Quazi Baseer Ahmed
7. Corporate Governance in Maharashtra Companies — 49
   Dr. Rajesh Bhausaheb Lahane
8. Effective Digital Marketing Strategies & Approaches — 59
   Dr Vikrant Uttamrao Panchal
9. Global Competitiveness of Indian Industries Strategy and Innovation — 70
   Dr. Rajendra Ashokrao Udhan
10. Indian logistics Trade in Dynamic World Scenario — 79
    Adnan Ali Zaidi, Dr Memon Ubed
11. साहित्यातील सामाजिकता व पाऊलखुणा — 95
    डॉ.सुनीता सांगोले
12. लातूर जिल्ह्यातील मराठी महिन्यानुसार यात्रांचे वितरण : एक भौगोलिक अभ्यास — 99
    प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर
13. हिंदी साहित्य में किसान विमर्श — 102
    डॉ. सुभाष इंगळे
14. हस्त भरत कला – मार्गदर्शन आणि उपयोगिता हस्त–भरतकलेचा इतिहास : — 105
    डॉ. एम.एन साखळकर
15. अध्यापन पध्दती व व्यावसायिक विकास घडवून आणणाऱ्या सुधारणा — 109
    डॉ. सतीश नारायण लोमटे

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue X , Vol. IV (Indexed) | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2018 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# साहित्यातील सामाजिकता व पाऊलखुणा

**डॉ.सुनीता सांगोले**

दयानंद कला महाविद्यालय,लातूर

---

दोन किंवा अधिक विद्याशाखातील आंतरक्रिया म्हणजे आंतरविद्याशाखीय अभ्यास होय. प्रत्येक विद्याशाखा ही अपुरीच असते. या दृष्टिकोनातून अशा अभ्यासाला सुरुवात झाली. साहित्यामध्ये इतर विद्याशाखा ह्या लपलेल्या असतात. सर्वच विद्याशाखा, सामाजिक शास्त्रे हे मानवाभोवती फिरतात. त्यांच्या सीमारेषा एकमेकांत गुंतलेल्या असतात. म्हणून आंतरविद्याशाखीय अभ्यास गरजेचा वाटू लागला.

साहित्य स्वभावतःच सर्व सामाजिक शास्त्राबरोबर हातात हात घालून चालत असते.[१] सामाजिक शास्त्रे बाह्यभौतिक परिस्थितीच्या आधारे कार्यकारणसंबंध स्थापित असतात. परंतु साहित्य व बाह्य परिस्थितीचे चित्रण तर करतेच. म्हणून साहित्य आणि समाजशास्त्रे एकाच वास्तवाचे चित्रण करीत असतात, फक्त साहित्यात काय आणि कसे दोन्हींचे चित्रण असते, तर शास्त्रात फक्त काय आहे याचे चित्रण असते.

सामाजिक शास्त्रे आणि साहित्य दोन्हींचे लक्ष मनुष्यच असेल तर काय आणि कसे ही पण परस्परांना पूरकच असली पाहिजेत. 'साहित्याला मानवतावादा' चे अधिष्ठान असते. साहित्य हे मानव्यसापेक्ष असल्यामुळेच मानवतावादाच्या दृष्टिकोनातून साहित्याचा अभ्यास झाला पाहिजे. आणि मानवतावाद ही मानव आणि सामाजिक जीवन या विषयीची विचारप्रणाली असल्यामुळे साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे.[२] हे सदा कऱ्हाडाचे मत उपरोक्त विषयाला समर्पक वाटते.

संत साहित्याच्या संदर्भात गो.म. कुलकर्णी म्हणतात, संत साहित्याचा परामर्श, समाजनिरपेक्ष अशा केवळ कलामूल्यांनी करणे शक्य असले तरी इष्ट ठरत नाही. कारण असे केल्यास या साहित्याचे सारे रहस्य हाती लागणे अशक्य आहे.[३] यातून सामाजिक अंगाचे महत्त्व विशद होते. श्रेष्ठ साहित्य हे परिणामकारक असते. देशकाल परिस्थितीच्या सीमा ओलांडून उभे राहते, कोणत्याही काळात किंवा कोणत्याही परिस्थितीत ते आपल्या गुणवत्तेने आपले लक्ष नेहमीच वेधून घेते. हे सारे खरे असले तरी साहित्याचा सारा अभिप्राय पूर्णतया हाती येण्याच्या दृष्टीने अशा साहित्याची वाङ्मयाप्रमाणे वाङ्मयेत्तर अंगानेही पाहणी करणे आवश्यक आहे. या विवेचनातूनही साहित्यातील सामाजिक अंगाचे महत्त्व समजते. साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाजव्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही. वाङ्मयनिर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेत रूजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, त्या काळात प्रभावी असणाऱ्या विचारप्रणाली आणि त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मयातील व शैलीविषयक परंपरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत असतात. साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वतःची वैशिष्ट्ये पूर्णतः ती जपत असते हे खरे आहे. पण याचवेळी ज्या काळात व ज्या परिस्थितीत ती निर्माण होते त्या परिस्थितीचा प्रभाव व मर्यादा ती पूर्णपणे ओलांडू शकत नाही.[४]

साहित्य म्हणजे काय या प्रश्नाचे निर्णायक उत्तर देणे कठीण आहे. तरी असे म्हणता येईल, साहित्य म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाच्या संबंधात मनुष्यमात्रांचा अभ्यास. साहित्य निर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे. तसाच तो संस्कृतीचा एक घटकही आहे. इतर प्राण्यांपेक्षा मानवी प्राण्यांचे विश्व व्यामिश्र आहे. इतर प्राणी कळप करुन राहतात. मनुष्य प्राणी समाज करुन राहतो. म्हणून तो समाजशील प्राणी आहे असे म्हटले जाते. त्याचा समग्र सामाजिक वारसा संस्कृती या शब्दात अभिप्रेत आहे. त्याच्या सांस्कृतिक जीवनातील स्थितिगतीचा आलेख साहित्यामधून प्रत्ययाला येऊ शकतो.

समाजाची जडणघडण, तिच्यातील अंतःप्रवाह, सामाजिक-आर्थिक संबंध अशा विविध घटकांचे परस्परसंबंध, तसेच शोषणसंबंध या सगळ्यांची जेथे जाणीव प्रकट होते, तेथे कोठे तरी सामाजिक जाणिव आकाराला येताना दिसते. तेथेच सामाजिक या संज्ञेलाही अर्थ प्राप्त होतो. जेथे सामाजिक जाणीव असते तेथे माणूसपण ही प्रकट होऊ लागते. अशा

सांगितले. समाजव्यवस्थेने शूद्रातिशूद्रांना शतकानुशतके सामाजिक व धार्मिक शोषण केले असे सामाजिक दुरावस्थेचे रोगनिदान जोतिबांनी केले.

केवळ मराठी साहित्यात नव्हे तर हिंदी, इंग्रजी कन्नड वगैरे भाषातील साहित्यकृतींमधूनही साहित्य व समाज यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट होताना दिसतो. हिंदीतील प्रसिद्ध साहित्यिक प्रेमचंद यांची गोदान ही अत्यंत गाजलेली कादंबरी. ही कादंबरी जी कृषक जीवनावरील महाकाव्य म्हटले असले तरी त्या काळचा समाज, अन्यायी इंग्रजी राजवट, सावकार, सरकारी अधिकारी आणि या सर्वांच्या क्रूर यंत्रणेत पिळवणूक होत असलेला सर्वसामान्य या सर्वांचे यथोचित वर्णन पहावयास मिळते.

कन्नड कादंबरी जा ओलांडूनी (दाटू) ही शिवराम कारंथ यांची साहित्यकृती. या साहित्यकृतीमध्येही आपली समाजव्यवस्था, जातीचे वर्चस्व, माणसाच्या मनामध्ये अतूटपणे चिकटून बसलेली जात या सर्वांचे यथायोग्य चित्रण आले आहे.

इंग्रजी नाटककार शेकस्पीअरच्या नाटकातूनही मनुष्य स्वभावाची असंख्य उदाहरणे पहावयास मिळतात.

साहित्यात माणसाचा स्वभाव, कृतिउक्ती, भावना, विचार कल्पना यांची अभिव्यक्ती असते. साहित्य ही एकाअर्थी अभिव्यक्ती असते तर समाज हे निमित्तकारण म्हटले पाहिजे. पुढील उदाहरणावरुन साहित्यनिर्मितीची ही प्रक्रिया सांगता येईल. मातीच घडा तयार होतो, या प्रक्रियेत कुंभार हे निमित्तकारण, मातीचा गोळा हे उपादान कारण, चाक आणि हात ही साधने, गती हे माध्यम, काठीच्या साह्याने चाकाला गती प्राप्त होते. चाकावर स्थिर असणाऱ्या मातीच्या गोळ्यालाही गती प्राप्त होते. तेंव्हा हाताच्या माध्यमातून कुंभाराच्या मनातील घड्याचे विकल्पन मातीच्या गोळ्यात संक्रमित होते. तरीही एक प्रश्न राहतो. रूपाचे विकल्पन कुंभाराच्या मनात होते कसे ? माणसाच्या भौतिक गरजा, माणसाचे समाजाशी असणारे संबंध, कुंभाराचे संकल्पनात्मक तसेच अनुभवाधिष्ठित ज्ञान इत्यादींवर हे वकल्पन अवलंबून असते.

साहित्यकृतीच्या निर्मितीत हीच प्रक्रिया अनुस्यूत असते. लेखक हे निमित्त्कारण, अनुभव हे उपादान कारण, शब्द आणि भाषा हे माध्यम अनुभवाच्या रूपाचे विकल्पन लेखकाच्या मनात होते. हे रुप अनुभवास प्राप्त होते. म्हणजे कलावंतांची मानसिक संरचना आणि मानसिक संरचनेत मानवी जाणीव आणि मानवी संवेदनांचा व्यवहार घडतो. म्हणून असे म्हणता येईल की, कलावंतांच्या मानसिक संरचनेची जडणघडणही सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत होत असते.

म्हणूनच साहित्य आणि समाज यांच्यातील अन्योन्य संबंध स्वभावतःच अतूट असतो. दृश्य आणि द्रष्टा, ज्ञेय आणि ज्ञाता, निर्माता आणि आस्वादक हे द्वैत सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणातच निर्माण होत असते. पण त्यांच्यातही पारंपारिक नाते असते.

**संदर्भसूची :**

१. सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंतःसंबंध, प्रा.मा.शं. सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती१९९५.
२. समाज आणि साहित्य- सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मयगृह-मुंबई, प्रथमावृत्ती १९९५.
३. मराठी साहित्यातील स्पंदने, गो.म. कुलकर्णी, सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८५.
४. साहित्य आणि सामाजिक संदर्भ, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००५.
५. साहित्याचा अन्वयार्थ-नागनाथ ग. कोतापल्ले, मेहता प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९६.
६. मराठी साहित्यातील स्पंदने, गो.म. कुलकर्णी, सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८५.
७. साहित्यविचार-अ.वा. कुलकर्णी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती
८. निवडक मराठी समीक्षा संपादक गो.मा. पवार / म.द. हातकणंगलेकर, साहित्य अकादमी राष्ट्रीय संग्रहालय नवी दिल्ली, प्रथमावृत्ती १९९९.
९. विसाव्या शतकातील मराठी समीक्षा - संपादक विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४
१०. समाज आणि समाज - ना.ग. कोतापल्ले- प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००१
११. समाज आणि साहित्य - सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मयगृह-मुंबई, प्रथमावृत्ती १९९५
१२. तत्रैव
१३. मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड १ ला - ल.रा. पांगारकर, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,पुणे, द्वितीयावृत्ती १९९२.

# Current Global Reviewer


ISSN 2319-8648

Peer Reviewed

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in